03 JUN 2024

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठातील नाट्य कार्यशाळेची सांगता

सकाळ वृत्तसेवा



शिवाजी विद्यापीठातील संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागातर्फे आयोजित नाट्य कार्यशाळेची आज सांगता झाली. त्यातील सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे देण्यात आली.

कोल्हापूर, ता. २ : शिवाजी विद्यापीठातील संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागातर्फे आयोजित नाट्य कार्यशाळेची आज सांगता झाली. त्यातील सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे देण्यात आली.

या कार्यशाळेमध्ये नाट्य कलाकार डॉ. राजश्री खटावकर यांनी 'नाटकातील अभिनय' या विषयावर उपस्थितांना मार्गदर्शन केले. नाट्य लेखक विकास कांबळे यांनी 'नाट्यलेखन विचार' याविषयी मार्गदर्शन केले. नाट्य अभिनेता युवराज केळुसकर यांनी 'रंगमंच तंत्र', डॉ. संजय तोडकर यांनी 'दिग्दर्शनाची कार्यपद्धती' यावर प्रात्यक्षिकासह मार्गदर्शन केले. दिग्दर्शक अनुप जत्राटकर यांच्या हस्ते सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे देण्यात आली. संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाचे प्रभारी विभागप्रमुख डॉ. विनोद ठाकूरदेसाई यांनी सहभागींना नाटक या विषयावर पुस्तके भेट दिली. जत्राटकर यांनी 'चित्रपट माध्यम आणि रंगभूमी यामधील समन्वय' या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
03 JUN 2024
तरुण भारत

# ६१२ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या उन्हाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा सुरु आहेत. गुरूवारपर्यंत ६१२ अभ्यासक्रमाचे निकाल जाहीर झाले. गुरूवारी झालेल्या ३ विषयांच्या परीक्षेला ५५ पैकी ४८ विद्यार्थी उपस्थित होते. भरारी पथकाकडून तिन्ही जिल्ह्यांतून कॉपीच्या प्रकाराची एकही नोंद झालेली नाही. परीक्षा प्रमाद समितीच्या नियमानुसार परीक्षा होत आहेत. तरी विद्यार्थ्यांनी नियमांच्या अधीन राहून परीक्षा द्यावी, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी केले आहे.